जा.क्रं./सा.आ./उपपदार्थ/कक्ष13/वेबनिविदा/2014
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक : 09/07/2014

# परिपत्रक

**विषय : सहकारी साखर कारखान्यांच्या निविदा संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणे बाबत**

सहकारी साखर कारखान्यांना त्यांच्या विविध कामांसाठी निविदा प्रसिध्द कराव्या लागतात. सदर निविदांच्या जाहिराती जास्त खप असलेल्या स्थानिक आणि राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देण्यात येतात. या जाहीराती देण्यासाठी येणारा खर्च मोठया प्रमाणावर असतो.

सहकारी साखर कारखान्यांच्या निविदांना चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी सदरच्या निविदा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द केल्यास त्यास व्यापक प्रसिध्दी मिळून स्पर्धात्मक निविदा प्राप्त होवून कारखान्यांना निविदा प्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे राबवून स्पर्धात्मक दराचा फायदा घेता येईल. तसेच वर्तमानपत्रात तपशीलवार निविदा प्रसिध्द करणेसाठी होणाऱ्या खर्चातही मोठया प्रमाणावर बचत करणे शक्य होईल. ही बाब विचारात घेता सर्व सहकारी साखर कारखान्यांना संकेतस्थळावरुन निविदा प्रसिध्द करण्याबाबत या परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

**राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या निविदा यापुढे त्यांच्या संकेतस्थळावरुन आणि/किंवा साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित मुंबई या संस्थाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द कराव्यात. निविदा प्रसिध्द करण्याबाबतची संक्षिप्त जाहीरात ही मोठया प्रमाणावर खप असलेल्या स्थानिक व राज्यस्तरीय किमान दोन वर्तमानपत्रातून देण्यात यावी. वर्तमानपत्रातील संक्षिप्त जाहीरातीत निविदेचे काम व अंदाजित खर्च, निविदा भरण्याची मुदत व निविदासंबंधीची कागदपत्रे कोठे उपलब्ध होतील याची नेमकी माहिती देण्यात यावी. तसेच निविदेसंबंधीची तपशीलवार सविस्तर माहिती ज्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येणार आहे त्या संकेतस्थळाचा स्पष्ट उल्लेख वर्तमानपत्रातील संक्षिप्त जाहिरातीत करण्यात यावा.**

सदर परिपत्रकीय सूचनांची अंमलबजावणी सर्व सहकारी साखर कारखान्यांनी तात्काळ करावी.

**साखर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना

1) अध्यक्ष / कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने.........(सर्व)
2) अध्यक्ष / कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म. मुंबई
3) महासंचालक, वंसतदादा शुगर इंन्स्टिटयूट, मांजरी ता. हवेली जि. पुणे
4) प्रादेशिक सहसंचालक (साखर).......(सर्व)

प्रत :मा. सचिव (सहकार) सहकार,पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई-32 याना माहितीस्तव सादर.